# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK

वणी - दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Vani-Dindori Road, Mhasrul, Nashik- 422 004

**Tel:** (0253) 2539190 / 6659190, **Student Helpline:** (0253) 2539111/6659111

**Web.:** http://www.muhs.ac.in **E-mail :** academic1@muhs.ac.in

MUHS

**डॉ. कालिदास द. चव्हाण** — **Dr. Kalidas D. Chavan**

एम.बी.बी.एस.,एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र), पीएच.डी.,डी.एस्सी. — M.B.B.S., M.D. (Forensic Medicine) Ph. D, D.Sc.

**कुलसचिव** — **Registrar**

मआविवि/शै.वि./ईओ/पदवी व पदव्युत्तर/३३०९/२०२१ दि.०९/१२/२०२१

## परिपत्रक क्र. ८४ /२०२१

**विषय :- विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांना, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांचे नियमितपणे उपस्थितीची नोंद ठेवणेबाबत...**

**संदर्भ :- १) विद्यापीठ परिपत्रक क्र.०१/२०२०, दि.१४/०१/२०२०,**
**२) विद्यापीठ परिपत्रक क्र.२०/२०२०, दि.२९/०७/२०२०,**
**३) विद्यापीठ परिपत्रक क्र.७६/२०२१, दि.१०/११/२०२१,**

उपरोक्त विषयानुषंगाने मला प्राप्त आदेशान्वये सर्व संलग्नित महाविद्यालयांना कळविण्यात येते की, मेडीकल स्टुडंट वेलफेअर असोसिशन यांच्यामार्फत राज्यातील सर्व वैदयकीय पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विदयार्थी शिक्षण घेत असताना बेकायदेशीरपणे महाराष्ट्रातील विविध खाजगी हॉस्पिटलमध्ये नोकरी करत असल्याचे व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विदयार्थी External Post Graduate चा अभ्यासक्रम करत असून महाविद्यालय नियमितपणे सुरु असताना महाराष्ट्रातील विविध जंबो कोविड सेंटर मध्ये बेकायदेशीरपणे नोकरी करत असल्याची व बऱ्याच संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकवर्ग महाविद्यालयात नियमितपणे उपस्थित राहत नसल्याबाबतच्या तक्रारी शासनास व विद्यापीठास प्राप्त झाली आहे.

संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थी व अध्यापकांची उपस्थिती ही महाविद्यालयाची जबाबदारी आहे. त्यामुळे, यासंदर्भात विद्यापीठाद्वारे परिपत्रक क्र.०१/२०२० अन्वये विद्यार्थी व अध्यापकांच्या बायोमॅट्रीक उपस्थितीची अंमलबजावणी व उपाययोजना करण्याबाबत नियमावली लागू करण्यात आली होती. सदर नियमावलीनुसार सर्व विद्यार्थी व अध्यापकांच्या उपस्थितीबाबत महाविद्यालयांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. तसेच, महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांकडुन बेकायदेशिरपणे नोकरी करत नसल्याबाबतचे हमीपत्र घेऊन विद्यार्थ्यांच्या नस्तीमध्ये जतन करुन ठेवावे.

तसेच, विद्यापीठ परिपत्रक क्र.२०/२०२० अन्वये महाविद्यालयस्तरावर शैक्षणिक अध्यापन सुरु ठेवणेबाबत व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आले होते. यासंदर्भात संबंधित महाविद्यालयांनी शैक्षणिक सत्र निहाय अभ्यासक्रम पुर्ण होईल याअनुषंगाने वेळापत्रक तयार करुन महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर व सर्व सूचना फलकांवर प्रसिध्द् करावे, जेणेकरुन सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांना याबाबतची माहिती मिळेल.

(कृ.मा.प.)

सर्व संलग्नित महाविद्यालयांनी केंद्र / राज्यशासन / जिल्हा स्थानिक प्रशासनाने व संबंधित केंद्र परिषदांनी कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे वेळोवळी प्रसिध्द् केलेल्या सर्व मार्गदर्शक तत्वांचे तंतोतंत पालन करुन महाविद्यालयस्तरावर अध्यापनाचे आयोजन करण्यात यावे.

यासंदर्भातील सर्व जबाबदारी महाविद्यालयांची असून याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास अथवा तपासणीअंतर्गत शिक्षक व विदयार्थ्यांच्या उपस्थितीबाबत अनियमितता दिसून आल्यास विदयार्थी व महाविद्यालयांवर कठोर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक सर्व शिक्षक व विदयार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

**कुलसचिव**

**प्रति,**
**मा. संस्थाचालक/अधिष्ठाता/प्राचार्य/संचालक,**
विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/परिसंस्था,
(पदवी व पदव्युत्तर पदवी)
**मआविवि, नाशिक.**

**प्रत माहितीस्तव** : परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग, मआविवि, नाशिक

सोबत - १) विद्यापीठ परिपत्रक क्र.०१/२०२०, दि.१४/०१/२०२०,
२) विद्यापीठ परिपत्रक क्र.२०/२०२०, दि.२९/०७/२०२०,